# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी

प्रस्तावना

**विषय:-** प्रारूप सुधारित विकास योजना भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका जि. ठाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २८ (३) अन्वये नियोजन समितीस मुदतवाढ देणेबाबत व कलम ३० अन्वये विकास योजना मंजुरी साठी शासनास सादर करणेकामी प्रस्ताव सादर करणे बाबत...

**संदर्भ:-** सर्व नियोजन समिती सदस्य यांचा दि. १२/७/२०२४ रोजीचा विनंती अर्ज.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम २६(१) मधील तरतूदीनुसार भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हद्दीची प्रारुप विकास योजना तयार करुन त्यासंबधीची सूचना उक्त अधिनियमाच्या कलम २६(१) अन्वये दिनांक १२/१०/२०२३ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द केली आहे.

उपरोक्त सूचनेच्या अनुषंगाने प्राप्त हरकती/सूचना धारकांना सुनावणी देण्यासाठी उक्त अधिनियमाचे कलम २८(२) अन्वये सूचना क्र. तांत्रिक/संसनर/वियोविध/भिनिश मनपा/३६४, दि. २४/०१/२०२४ अन्वये गठीत झालेली आहे.

उक्त अधिनियमाचे कलम २८(३) अन्वये नियोजन समितीची नियोजन प्राधिकरणास प्राप्त हरकती/सूचनांवर सुनावणी देऊन अहवाल सादर करण्याची मूळ मुदत दोन महिने म्हणजेच दि. २३/०३/२०२३ पावेतो आहे.

उक्त नियोजन समितीने प्रसिद्ध प्रारूप विकास योजनेवर प्राप्त हरकत/ सुचनांची संख्या विचारात घेऊन त्यांचेकडील दि. २०/०३/२०२३ रोजीच्या पत्रान्वये अधिनियमाच्या कलम २८(३) मधील तरतुदीनुसार प्राप्त हरकती/सूचनांचा सुनावणी अहवाल सादर करण्यासाठी दि. २४/०३/२०२४ ते २२/०५/२०२४ पर्यंतची २ महिन्याची मुदतवाढ पत्रात नमूद कारणास्तव मंजूर होण्यास विनंती केलेली त्यास मा. प्रशासकिय ठराव क्र.४३५ दि.२६/०३/२०२४ अन्वये मंजुरी देण्यात आलेली होती.

मात्र, सार्वत्रिक लोकसभा निवडणूक -२०२४ कार्यक्रम दि. १७/३/२०२४ रोजी घोषित झाला असुन दि.१८/३/२०२४ पासुन ते दि.०४/०६/२०२४ पर्यंत लोकसभा निवडणुक-२०२४ ची आचारसंहिता लागु झाली होती तदनंतर, मा. भारतीय निर्वाचन आयोग यांनी PRESS NOTE क्र.जा. क्र ECI/PN/१००/२०२४ दि. २४/५/२०२४ अन्वये Biennial election to the Maharashtra Legislative Council from 02 Graduates and 02 Teacher's Constituencies – reg. निवडणुक कार्यक्रम जाहिर करण्यात आला असुन तो दि. ३१/५/२०२४ ते दि.५/७/२०२४ पर्यंत असल्याने सदर सुनावणी चालु आचारसंहितेच्या कालावधीत पुन्हा स्थगित ठेवुन आचारसंहितेचा कालावधी संपल्यानंतर म्हणजे दि.०८/०७/२०२४ पासुन आयोजीत करण्यावाबत निर्णय घेण्यात आले आहे.

उक्त नियोजन समितीने प्रसिद्ध प्रारूप विकास योजनेवर प्राप्त हरकत/ सुचनांची संख्या विचारात घेऊन त्यांचेकडील दि. १२/०७/२०२४ रोजीच्या पत्रान्वये अधिनियमाच्या कलम २८(३) मधील तरतुदीनुसार प्राप्त हरकती/सूचनांचा सुनावणी अहवाल सादर करण्यासाठी दि. १३/०७/२०२४ ते दि.१२/०९/२०२४ पर्यंतची २ महिन्याची मुदतवाढ पत्रात नमूद कारणास्तव मंजूर होण्यास विनंती केलेली आहे.

**तसेच** आचारसंहितेचा कालावधी विचारात घेऊन कलम ३० अन्वये प्रारुप विकास योजना शासनाकडे सादर करावयाची मुळ मुदत हि दि.१/८/२०२४ रोजी संपुष्ठात येते. म. प्रा. व न. र अधि., १९६६ चे कलम ३०(III) नुसार ज्या शहरांची लोकसंख्या अलीकडच्या जनगणनानुसार १० लाखापेक्षा कमी आहे त्यांना ६ महिण्यांची मुदतवाढ देण्याची तरतुद आहे. भिवंडी निजामपुर शहर महानगर पालीकेची २०११ च्या जनगणने नुसार लोकसंख्या १० लाखापेक्षा कमी

Scanned with OKEN Scanner

असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे ६ महिने मुदतवाढ अनुज्ञेय आहे. महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने शासन निर्णय क्र. टि.पी.एस.- १८१३/३२११/प्र.क्र.५०८/नवि-१३, दि. ०१/१२/२०१६ अन्वये म. प्रा. व न. र अधि., १९६६ चे कलम १५१ अन्वये अधिकाराचे प्रत्यायोजन केले असून त्यानुसार उक्त अधिनियमाचे कलम ३० अन्वये सर्व महानगरपालिका क्षेत्रातील विकास योजना शासनास मंजुरीस्तव सादर करणे करिता मुदत वाढ देण्याचे अधिकार मा. संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य पुणे यांना प्रत्यायोजीत करण्यात आले आहेत. सबब त्या नुसार तसा प्रस्ताव नगररचना संचालनालय, पुणे यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे.

सद्या मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नाहीत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार प्रशासक या नात्याने आयुक्त, भि.नि.श.म.न.पा. पाहत आहेत. विषयांकित नमुद कलम 28 (3) व कलम 30 (III) अन्वये प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

**प्रशासकिय ठराव क्र.** ४५५ दि. १६/07/२०२४

नियोजन समितीने पत्रात नमूद केलेली कारणमिमांसा व त्यावर विभागाकडुन प्रस्तावित करण्यात आल्यानुसार भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या प्रारुप सुधारित विकास योजना कार्यवाही अनुषंगाने गठित करण्यात आलेल्या नियोजन समितीला मुदतवाढ मंजुर करणे आवश्यक असल्याने उक्त नियोजन समितीला प्राप्त हरकती/सूचनांची सुनावणी घेऊन अहवाल सादर करण्यासाठी, कलम २८(३) अन्वये दि. १३/०७/२०२४ ते दि. १२/०९/२०२४ पर्यंतची २ महिन्याची मुदतवाढ तसेच विकास योजना शासनास मंजुरीसाठी सादर करण्याकामी मुदत वाढीचा प्रस्ताव मा. संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य पुणे, यांच्याकडे सादर करण्याकामी या ठरावाव्दारे मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

(अजय विलास वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त,
भिवंडी नि. श. महानगरपालिका, भिवंडी.

15/7/2024

Scanned with OKEN Scanner